जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 OCT 2026
सकाळ

जागतिक 'फ्लॉवर फेस्टिव्हल'मधून सौंदर्याची अनुभूती

मंत्री हसन मुश्रीफ : शानदार वातावरणात 'ग्लोबल फ्लॉवर फेस्टिव्हल'चे उद्घाटन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : धार्मिक, सामाजिक, कला-सांस्कृतिक ठेव्याचे मनोहरी फुलांद्वारे दर्शन घडविणारा जागतिक दर्जाचा 'फ्लॉवर फेस्टिव्हल' 'सकाळ माध्यम समूहा'च्या माध्यमातून कोल्हापुरात होत आहे. या फेस्टिव्हल्समधील फुलांच्या देखण्या सौंदर्याची अनुभूती कोल्हापूरकरांसह पर्यटक, भाविकांनी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी आज येथे केले.

महाराष्ट्रात प्रथमच होत असलेल्या आंतरराष्ट्रीय मानांकनाचा 'सकाळ' प्रस्तुत 'ग्लोबल फ्लॉवर फेस्टिव्हल' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. येथील पोलिस उद्यानमधील कार्यक्रमास खासदार धनंजय महाडिक, महापौर रूपाराणी निकम, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मे. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ सराफ आणि जव्हेरीचे संचालक सिद्धार्थ गाडगीळ, हिमगौरी गाडगीळ, गोविंदराव शोभाराम अँड कंपनीचे (जीएस चहा) संचालक आर. एन. शहा, रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी, गोडहिंग्लजचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, विश्वपंढरीचे निरंजनदास सांगवडेकर, 'सकाळ'चे चिफ रेव्हेन्यू ऑफिसर रूपेश मुतालिक प्रमुख उपस्थित होते.

फ्लॉवर फेस्टिव्हलच्या माध्यमातून कोल्हापुरात नावीन्यपूर्ण, अनोखा उपक्रम राबविल्याबद्दल 'सकाळ'चे मनःपूर्वक कौतुक करते. कोल्हापूरला ग्लोबल ओळख देणाऱ्या 'सकाळ'च्या उपक्रमांना महापालिकेचे पाठबळ राहील, अशी ग्वाही महापौर निकम यांनी दिली. या फेस्टिव्हल्समुळे कोल्हापूर आणि 'सकाळ'चे ब्रँडिंग चांगल्या पद्धतीने जगभरात होणार आहे. कोल्हापूरमधील आध्यात्मिक, निसर्ग पर्यटनवाढीला शिवाजी विद्यापीठाकडून पाठबळ दिले जाईल, असे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले.



कोल्हापूर : 'सकाळ' प्रस्तुत 'ग्लोबल फ्लॉवर फेस्टिव्हल'चे उद्घाटन रविवारी पोलिस उद्यान येथे वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, खासदार धनंजय महाडिक यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी डावीकडून डॉ. व्ही. एन. शिंदे, सुजय पित्रे, महापौर रूपाराणी निकम, डॉ. ज्योती जाधव, निरंजनदास सांगवडेकर, कुलगुरू डॉ. आर. के. कामत, आर. एन. शहा, एम. एल. चौगुले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव यांनी प्रास्ताविक केले. जगात जे उत्तम, चांगले आहे ते कोल्हापुरात आणण्याची भूमिका 'सकाळ'ची आहे. त्यातूनच 'ग्लोबल फ्लॉवर फेस्टिव्हल' आयोजित केला आहे. त्याच्या माध्यमातून फुलांची वेगळी अनुभूती सर्वांना घेता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. 'ग्रीन आर्मी'चे अध्यक्ष सुजय पित्रे यांनी फ्लॉवर फेस्टिव्हलची माहिती दिली. 'सकाळ'चे सरव्यवस्थापक (दक्षिण महाराष्ट्र) यतीश शहा यांनी आभार मानले. केतकी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारा 'सकाळ'

समाजातील विविध घटकांसाठी बातम्यांच्या पलीकडे जाऊन नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात 'सकाळ' अग्रेसर असल्याचे खासदार महाडिक यांनी सांगितले. रंग, सुगंध, आनंदाचा संगम असणाऱ्या लाखो फुलांचा 'ग्लोबल फ्लॉवर फेस्टिव्हल'चे नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी उद्घाटन करताना आनंद वाटत आहे. नागरिक, पर्यटक, भाविकांनी आवर्जून या फेस्टिव्हलला भेट द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

लक्षवेधक कोल्हापुरी साज...

मे. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ सराफ आणि जव्हेरी यांच्यातर्फे या फेस्टिव्हल्समध्ये फुलझाडांतून कोल्हापुरी साजाचे भव्य आणि लक्षवेधक प्रतिकृती साकारली आहे. या गाडगीळ सराफ आणि जव्हेरीचे संचालक सिद्धार्थ आणि हिमगौरी गाडगीळ यांचे स्वागत 'सकाळ'चे संपादक पंडितराव आणि सरव्यवस्थापक शहा यांनी केले. संचालक गाडगीळ यांनी फेस्टिव्हल्समधील आकर्षक प्रतिकृती, कलाकृती पाहून आनंद व्यक्त केला.

'सकाळ'च्या पाठबळावरच साकारला फेस्टिव्हल

'सकाळ'च्या पाठबळावरच कोल्हापुरात आम्ही 'ग्लोबल फ्लॉवर फेस्टिव्हल' साकारला असल्याचे पित्रे यांनी सांगितले. 'ब्लूम्स् बियॉन्ड बॉर्डर्स' या संकल्पनेवर आधारित असलेल्या या फेस्टिव्हलची तयारी सहा महिन्यांपासून केली असून, त्यात नेदरलँड्स (हॉलंड), अमेरिका, जर्मनी, जपान, थायलंड, व्हिएतनाम, स्वित्झर्लंड आणि बेल्जियम आदी देशांतील फुलांच्या विविध दुर्मीळ प्रजातींचा समावेश केला आहे. या फेस्टिव्हलसाठी 'केएमसी' हे नॉलेज पार्टनर असून, सकाळच्या व अंमलबजावणी 'ग्रीन आर्मी'ची असल्याचे त्यांनी सांगितले.

महोत्सवाचे प्रायोजक असे

- पॉवर्ड बाय : मे. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ सराफ आणि जव्हेरी
- मेन स्पॉन्सर : गोविंदराम शोभाराम अँन्ड कंपनी (जी. एस. चहा)
- को-स्पॉन्सर : शिवाजी विद्यापीठ
- असोसिएट स्पॉन्सर्स : श्री सद्गुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट (कोल्हापूर), श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटी लिमिटेड (गडहिंग्लज), तोडकर संजीवनी निसर्गोपचार केंद्र, संजय घोडावत ग्रुप, आविष्कार इन्फ्रा, रिलायन्स डिजिटल, नेक्सस इव्हेंट, ॲस्टर आधार हॉस्पिटल.
- हॉस्पिटॅलिटी पार्टनर : डी. वाय. पाटील ग्रुप

Powered By PNG ज्वेलर्स मे. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ
Main Sponsor GS TEA Asli Swaad Asli Andaaz
Co Sponsor
Associate Sponsors
Associate Sponsors GARUDA DHOOMAKETU GROUP AVISHKAR INFRA Digital NEXUS EVENT Aster AADHAR HOSPITAL
Hospitality Partner DYP D Y PATIL GROUP

12 OCT 2026

सकाळ

मल्लखांब स्पर्धेत मृणाली पाटीलला सुवर्णपदक



मृणाली पाटील

कोतोली : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे आयोजित आंतरविभागीय महिला रोप मल्लखांब स्पर्धेत कोतोली (ता. पन्हाळा) श्रीपतराव चौगुले आर्टस् अँड सायन्स कॉलेजमधील बी. एस्सी भाग २ ची विद्यार्थिनी मृणाली अमोल पाटील हिने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. तिची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला रोप मल्लखांब स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. तिला संस्थेचे अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले, सचिव शिवाजीराव पाटील, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील आणि प्रा. यू. एन. लाड यांचे मार्गदर्शन लाभले.

12 OCT 2026

लोकमत

अस्मिताचे सुवर्णपदक

कोल्हापूर : महावीर महाविद्यालयातील



बी.ए. भाग १ मध्ये शिक्षण घेणाऱ्या अस्मिता दत्तात्रय ढोणे हिने कुरुंदवाड येथे निपाणीच्या देवचंद महाविद्यालयाने आयोजित वेटलिफ्टिंग स्पर्धेत दमदार कामगिरी केली. तिची गुजरात येथे होणाऱ्या वेस्ट झोन आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे.अस्मिताने आंतरविभागीय वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धा २०२६-२७ मध्ये ५३ किलो वजनी गटात तब्बल १७५ किलो वजन उचलून सुवर्णपदक मिळवले. या यशाबद्दल चेअरमन ॲड. के. ए. कापसे, व्हाइस चेअरमन ॲड. अभिजीत कापसे, एम.बी. गरगटे आदींचे प्रोत्साहन लाभले.